Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed Indexed**


**Multidisciplinary International Research Journal**

## Match -2020

**SPECIAL ISSUE**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

## March-2020

**SPECIAL ISSUE- CCXXIII (223)**








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

**Multidisciplinary International Research Journal**

## Peer-Reviewed Indexed

**March - 2020**

**SPECIAL ISSUE – CCXXIII 223**

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Aadhar International Publications**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**

**Director,**

Aadhar Social Research &,

Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**

**Executive-Editors -**

- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

**Email :** aadharpublication@gmail.com**Website :** www.aadharsocial.com**Mobile : 9595560278**

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | सतीश तराळांची ग्रामीण कथा : आशय आणि अभिव्यक्ती — डॉ. अलका गायकवाड–लुंगे | 1 |
| 2 | मत्तेची बँकींग क्षेत्रातील उपयुक्तता — डॉ. सौ. सपना आर. वेगीनवार | 5 |
| 3 | बालसंगोपनात पालकांसमोरी आव्हाने — प्रा. सुषमा जयकुमार फरसोले | 8 |
| 4 | आधुनिकव कौटिलीय कूटनीती आणि जातकीय खत्तिविज्जावादाचे विवेचन — डॉ. ओमकुमार टोम्पे | 11 |
| 5 | काले धन के स्त्रोत प्रभाव एवंनियंत्रण करने के लिए सुझाव–एक अध्ययन — प्रा. डॉ. ए.बी.पटले | 18 |
| 6 | पंचायतराज मधील महिला नेतृत्व व वास्तव — प्रा. गौतम कांबळे | 23 |
| 7 | आदिवासी समाजातील कुमारी मातांची वर्तमान स्थिती. — प्रा. डॉ. श्रीराम खाडे | 26 |
| 8 | अर्थव्यवस्थेच्या विकासात सरकारची भूमिका — डॉ. प्रदीप दरवरे | 31 |
| 9 | महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार — प्रा. डॉ. सुभाष के. पवार | 35 |
| 10 | महात्मा गांधी का दृष्टिकोण एवं प्रबन्धकीय कौशल — डॉ. मधुलता व्यास | 39 |
| 11 | महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातुन वंचितांचा इतिहास –एक मिमांसा — फकिरा भगवान राजगुरू | 43 |
| 12 | महिला व बालक हक्क अधिकार कायदा व सुव्यवस्था टिकात्मक परीक्षण — प्रा. डॉ. निना सा. चवरे | 50 |
| 13 | कामायनी महाकाव्य की प्रासंगिकता विक्रम — बालकृष्ण वारंग | 55 |
| 14 | किसान क्रेडिट कार्ड योजना : एक अध्ययन — प्रा.डॉ.शालिनी के.पांडे | 60 |
| 15 | महात्मा जोतीराव फुले व समकालीन समाजसुधारक पंडिता रमाबाई — प्रा. डॉ. सुनिल चवळे | 64 |
| 16 | मुद्रा योजनेची कामगिरी — महाजन संजय बाबुराव | 67 |
| 17 | वित्तीय बाजारपेठा आणि वित्तीय संस्था यामधील समन्वय — प्रा.डॉ. संजय उ. उल्हे | 80 |
| 18 | Digital Profiling As A Threat To Democracy — Dr. Jyoti D. Thakare | 82 |

Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार

प्रा. डॉ. सुभाष के. पवार
सहयोगी प्राध्यापक स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ.
ता. जि. अमरावती.

**प्रास्तावना :**

सपूर्ण जगाला शांतीचे संदेश देणारे महात्मा गांधी हे एक आदर्शवादी व अध्यात्मवादी पुरुष होते. तसेच ते मानवतावादी सुध्दा होते. महात्मा गांधी बद्‌ल लॉर्ड हॅलिफॅक्स असे म्हणतात की, "संपूर्ण इतिहासात अशा व्यक्ती फारच कमी आढळतात की ज्या आपल्या चारित्र्याने व दृष्टांताने पुढच्या पिढीला इतका खोलवर परिणाम करतात." तर फ्रान्समधील लियान ब्लमच्या मते "मी मांधीजीना कधी पाहिले नाही, त्यांची भाषा मला अवगत नाही आणि त्यांच्या देशात मी कधी पाय देखील ठेवला नाही, तरीपण त्यांच्या मृत्यूने अगदी जवळच्या दोस्तांचा मृत्यू झाल्यासारखे मला दुःख होत आहे." अशा प्रकारचे गौरवउद्‌गार पाश्चिमात्य विचारवंतानी केले आहे. महात्मा गांधीजीची महानता ही गांधीजींनी मांडलेले विचार आणि कार्य यावरुन दिसून येते.

**विषयाची निवड :**

महात्मा गांधी यांनी आपले विचार 'हरीजन व यंग इंडिया' या वर्तमानपत्रातून व्यक्त केले आहे. महात्मा गांधीजींचा दृष्टीकोन मानवतावादी होता. कर्म व चिंतन यांचा योग्य समन्वय महात्मा गांधी यांनी साधला होता. महात्मा गांधी यांनी हिंद स्वराज्य, गीताबोध, आत्मकथा, माझे समकालीन, सर्वोदय, मंगल प्रभात, ब्रम्हचर्य, राष्ट्रवाणी, ग्रामसेवा, खादी, आत्मशुध्दी, गीताई, धर्मनीती, नीतीधर्म, सत्याग्रह ईत्यादी ग्रंथ लिहिले आहे. महात्मा गांधीजींनी आपले विचार विशिष्ट वेळेच व्यक्त केले नाही तर निरनिराळ्या वेळी व परिस्थितीनुसार व्यक्त केले आहे. गांधीवाद म्हणून कोणताही सिंध्दात नाही. सत्य व अहिसा ह्यांची ज्योत सतत तेवत रहावी एवढेच त्यांचे म्हणणे होते. महात्मा गांधी यांनी सत्य व अहिंसा याबाबत जे विचार व सिंध्दात मांडले आहे, त्या सिंध्दांताचा अभ्यास करण्याच्या हेतूने 'महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार' याविषयाची निवड अध्ययनासाठी निवड केली आहे.

**अध्ययन विषयाची उद्दिष्टये:**

१. महात्मा गांधी यांचे सत्यबाबतचे विचार यांचे अध्ययन करणे
२. सत्याचे प्रकार याविषयी अध्ययन करणे
३. अहिंसा या सिंध्दातांचे अध्ययन करणे
४. अहिंसेची तत्वे व प्रकार याविषयी अध्ययन करणे

**ISSN : 2278-9308**
**March 2020**

संशोधन पध्दती :

सदरील लघुशोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीय सामग्रीत विविध ग्रंथ, मासिके, इंअरनेट इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण स्पष्ट करण्यात आले आहे.

सत्य व अहिंसा याबाबतचे विचार :

सत्य व अहिंसा हे महात्मा गांधीजीच्या विचारांचे मुलाधार आहेत. मानवी संस्कृतीच्या विकासातील महात्मा गांधीजीचे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे त्यांचे सत्याग्रहाचे तत्वज्ञान होय. सत्य व अहिंसा ही तत्वे नवीन नाहीत, प्राचीन काळापासुन अनेक प्रेषितांनी आणि तत्ववेत्यांनी सत्य व अहिंसेचा आग्रह धरलेला आहे. उपनिषधातील तत्वज्ञानात सत्य हाच सर्व विश्वाचा आधार मानलेला आहे. गौतम बुध्द आणि महाविर यांनी मानवाला अहिंसा आणि प्रेम यांची शिकवण दिली आहे. येशु ख्रिस्तानेही जगाला दया आणि प्रेम याची शिकवण दिली. तेव्हा सत्य व अहिंसा यांचे तत्वज्ञान जगाला नवीन नाही. महात्मा गांधीजीच्या विचारातील वेगळेपण यामध्ये आहे की, सत्याग्रह आणि अहिंसा या जुन्या तत्वांचा वापर त्यांनी अन्याय आणि जुलूम याविरुध्द लढण्याचे मार्ग म्हणुन केला आहे.

सत्य :

सत्य हा महात्मा गांधीजीच्या विचारांचा पाया आहे. महात्मा गांधी हे व्यक्तिला व समाजाला नैतिक बनवू इच्छित होते. यासाठी त्यांनी दोन तत्वांचा स्विकार केला आहे. सत्य व अहिंसा एक दुस-याला पुरक आहेत. सत्याशिवाय कोणतेही तत्वपूर्ण होत नाही. महात्मा गांधी यांनी सत्याचे दोन प्रकार सांगीतले आहे.

१. सापेक्ष सत्य : व्यक्ती किंवा परिस्थितीनुसार सत्याची कल्पना बदलत असल्यास त्याला सापेक्ष सत्य असे म्हणतात. सापेक्ष सत्याला पुर्ण सत्य म्हणता येत नाही.

२. निरपेक्ष सत्य : निरपेक्ष सत्य हे शाश्वत असते. निरपेक्ष सत्य म्हणजे सत, चित व आनंद यांचा सुदर मिलाफ आहे. निरपेक्ष सत्य म्हणजे इश्वर आहे.

सत्याचा अर्थ म्हणजे सर्वावर प्रेम, सेवा आणि अध्यात्मिक एकता प्राप्त करणे होय. सत्य म्हणजे सर्वोच्छ प्रेम, सर्वोच्छ दया, आत्मबलिदान होय. सॉक्रेटिस, येशु ख्रिस्त यांनी सत्यासाठी स्वतःचा जीव घालवला, धैर्य, विवेक, आत्मविश्वास आणि त्याग हया सर्व गोष्टी सत्याच्या प्राप्तीसाठी गरजेचे आहे.

अहिंसाः

सत्य हे गांधीवादाचे ध्येय आहे. तर अहिंसा हा सत्यापर्यंत जाण्याचा मार्ग आहे. सत्य आणि अहिंसा ही परस्परांशी एवढी संबंधित आहेत की, त्यांना एकमेकापासून वेगळे करणे अशक्य असते. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. अहिंसा हे साधन आहे तर सत्य हे साध्य आहे. द्वेषाने स्वार्थी भावनेने दुस-याला पिडा देण, त्यांच्यावर शारीरिक हल्ला करणे म्हणजे हिंसाचार होय. आणि

शारीरिक तसेच मानसिक दृष्टया त्यापासुन अलिप्त राहणे म्हणजे अहिंसा होय. महात्मा गांधीजींची अहिंसा निषेधात्मक, विधायक आणि निरपेक्ष स्वरुपाची आहे.

अ. निषेधात्मक अहिंसा :

व्यक्तिने आपल्या कार्याद्वारे, शब्दाद्वारे इतरांना कष्ट पोहचवू नयेत, यालाच निषेधात्मक अहिंसा असे म्हणतात. कुणालाही दुःख न देणे व कुणाची हत्या न करणे यालाच विरोधात्मक अहिंसा असेही म्हणतात.

ब. विधायक अहिंसा :

दुस-यावर प्रेम करुन त्यांच्या सुखसाठी काम करणे हीच खरी अहिंसा आहे. दुर्बल घटक, मुलांना आणि महिलांना कुणी त्रास देत असतील तर अशावेळी मदतीला धावून न जाणे म्हणजे एक प्रकारे हिंसेला मदत करणे आहे. असे महात्मा गांधीजींचे मत आहे. स्वतःच्या त्रासाची व कष्टाची पर्वा न करता दुस-यांच्या सुखासाठी झटणे हीच अहिंसेची खरी कसौटी आहे.

क. निरपेक्ष अहिंसा :

ही अहिंसा अत्यंत महान व्यक्तिची आहे. धर्माचे पूर्णपणे पालन करणे म्हणजे निरपेक्ष अहिंसा आहे. महात्मा गांधी यांनी तीन प्रकारची अहिंसा सांगीतलेली आहे.

१. वीर पुरुषंची अहिंसा : सर्वात महत्वाची अहिंसा म्हणजे वीर पुरुषांची अहिंसा आहे. ही अहिंसा राजकीय नाही तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ती पहावयास मिळते. ह्या अहिंसेत खुप मोठी शक्ती असते. ही अहिंसा वीर पुरुषांचे भूषण आहे असे महात्मा गांधीजी म्हणतात.

२. दुर्बलांची अहिंसा : दुर्बलंची अहिंसा ही वीर पुरुषांच्या अहिंसे इतकी प्रभावशाली नसते. कारण जीवनातील काही क्षेत्रात काही गोष्टी डोळ्यासमोर ठेवून काही व्यक्तीकडून ही अहिंसा उपयोगात आणली जाते. निश्चित परिणामाकडे पोहचवायचे ते एक साध्न आहे. आपल्या दुर्बलतेमूळे सत्य व साहस यांची जोड मिळाल्यास दुर्बल अहिंसा काही प्रमाणात उपयोगी ठरु शकते.

३. भिऱ्या व्यक्तिची अहिंसा : महात्मा गांधी असे म्हणतात भिती व अहिंसा ह्या दोन गोष्टी एकत्र राहु शकत नाही. जेव्हा व्यक्तीत परिस्थितीचा सामना करण्याचे धाडस राहत नसते तेव्हा ती व्यक्ती घाबरुन अहिंसेच्या तत्वांचा आश्रय घेते. या अहिंसेपेक्षा हिंसा चांगली आहे असे महात्मा गांधी म्हणतात. 'एकवेळ हिंसाचारी व्यक्तीला अहिंसक बनविता येते पण अहिंसेचे पांघरुण घेणा-या दुर्बल व्यक्तीला मात्र अहिंसक बनविता येणार नाही.

अहिंसेचा मार्ग हा हिंसेपेक्षा श्रेष्ठ मानलेला आहे. हिंसेच्या मार्गाचा अवलंब करुन एखादी व्यक्ती बलवान बनते पण त्यापेक्षा जास्त अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करुन ती व्यक्ती अधिक शक्तीमान बनत असते. अहिंसेचा लढा हा नैतिक बळावर लढल्या जात असते. हिंसात्मक मार्गाने समस्यांची कायम स्वरुपाची उकल होत नाही. उलट हिंसेच्या मार्गाचा अवलंब केल्यास त्यातून नव्या संघर्षाची बीजे रोवली जातात. आणि त्यातून नवीन प्रश्न निर्माण होतात. हिंसेने हिंसाचार नष्ट होत नाही तर तो उलट वाढतो. म्हणून जगातून हिंसाचार नष्ट होण्यासाठी अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे. अहिंसा हा मार्ग व्यक्तिगत तसेच सामूहिकरित्या आचरणात येणारा मार्ग आहे.

एवढेच नव्हेतर राष्ट्रा-राष्ट्रांना सुध्दा परस्परांतील संबंधाबावत हा मार्ग वापरता येणे शक्य आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी हिंसेचा मार्ग सोडून देणे ही तातडीची गरज आहे. अहिंसेच्या मार्गाचा हिमतीने आणि विनशर्त स्वीकार केल्याशिवाय सर्वनाशापासून वाचण्याचा दुसरा मार्गच नाही. अहिंसेचा लढा देणारा व्यक्ती सत्यनिष्ठ, न्यायप्रिय, आणि नितीमान असणे महत्वाचे आहे. अन्याय आणि जुलूम याविरुध्द लढण्याचे ते एक महत्वाचे हत्यार आहे.

संदभग्रंथ सूची :

१. प्रा. वि.क. देशपांडे, (२००९) भारतीय राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर.
२. र. घ. वराडकर, (२०११) भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
३. कान्ता मीणा, हेमराज मीणा, (२०११) गांधी नेहरु अम्बेडकर, आदि पब्लिकेशन, जयपुर.
४. कमलेश कुमारसिंह, (२००८) प्रमुख राजनितिक विचारधाराऍ, राधा पब्लिकेशन, नयी दिली.
५. नरेंद्र चपळगावकरए (२०१३) महात्मा गांधी आणि भारतीज राज्यघटना, राजहंस प्रकाशन, पुणे.
६. ब्रिजमोहन हेडा, प्यारेलाल, (२००४) महात्मा गांधी अखेरचा पर्व, ग्रंथ प्रकाशन, अकोला.
७. राजमोहन गांधी, (२०१३) मोहनदास, मेहता पब्लिकेशन, पुणे.
8- Acoff L. Russell,The Desigin of Social Research,The University of Chicago Press,Chicago (1961)

Website :

A. www.Google.com
B. www.shodhgnaga.co